**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मुंबई दौऱ्यावर

- दहशतवाद प्रतिबंधासाठी केंद्र सरकारकडून प्रहार या नव्या धोरणाची घोषणा

- राज्यपालांच्या अभिभाषणानानं राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात, शोकाकुल वातावरणात दोन्ही सभागृहात अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा

- ‘बुंग’ या मणीपुरी चित्रपटाला बाल आणि कौटुंबिक फिल्म गटात बाफ्टा पुरस्कार

**आणि**

- रणजीच्या अंतिम सामन्यात पहिल्यांदाच पोहोचलेल्या जम्मू-काश्मिरचा उद्या कर्नाटकसोबत सामना

**<><><><><>**

जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन उद्या मुंबईत लोकभवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. परवा बुलडाणा जिल्ह्यात शेगाव इथं केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्यालाही राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. तसंच नागपुरात आयोजित ‘एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचं सुवर्णयुग’ या उपक्रमाच्या उद्घाटन समारंभालाही त्या उपस्थित राहणार आहेत. दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यानंतर त्या गुरुवारी झारंखंड, तर शुक्रवारी राजस्थानचा दौरा करणार आहेत.

**<><><><><>**

दहशतवादी कारवायांचं बदलतं स्वरूप आणि त्यातून भविष्यात निर्माण होणाऱ्या संकटांना मुळातूनच प्रतिबंध करण्यासाठी केंद्रसरकारने प्रहार हे नवीन

सर्वसमावेशक धोरण जाहीर केलं आहे. दहशतवाद्यांकडून दळणवळण आणि माहिती आदानप्रदानासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो, तसंच संहारक शस्त्र आणि इतर सामुग्रीचा वापर होतो, हे लक्षात घेऊन सर्व स्वरूपाच्या दहशतवादी कृत्यांना पायबंद घालण्यासाठी व्यापक नियोजन यात करण्यात आलं आहे. दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता आणि दहशतवादाचा बळी ठरलेल्यांना आधार ही भारताची भूमिका या धोरणात स्पष्ट करण्यात आली आहे.

**<><><><><>**

स्वतंत्र भारताचे पहिले आणि एकमेव गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या अर्धपुतळ्याचं अनावरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झालं. चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना सन्मानित करून आपण भारताच्या आत्मगौरवाचा सन्मान केला आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

‘भारत टॅक्सी’ या देशातल्या पहिल्या सहकारी टॅक्सी सेवेच्या सदस्य चालकांशी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्ली इथं संवाद साधला. या सेवेचं उद्दिष्ट चांगली सेवा देण्याबरोबरच टॅक्सी चालकांचं हित साधणं असं असल्याचं शहा यांनी स्पष्ट केलं. भारत टॅक्सी सेवेवर चालकांसाठीही ऑनलाईन तक्रार नोंदवण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल, असं ते म्हणाले.

**- - होल्ड- बाईट- अमित शहा - - -**

**<><><><><>**

स्थूल राष्ट्रीय उत्पादनात महाराष्ट्राचं योगदान साडेतेरा टक्के असून देशात सर्वात जास्त परदेशी गुंतवणूक आकर्षित करणारं राज्यही महाराष्ट्रच असल्याचं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केलं आहे. राज्य विधिमंडळाच्या

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीला दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत त्यांनी राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला.

त्यानंतर दिवंगत उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात आज शोकप्रस्ताव मांडण्यात आला. अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडणं हा आपल्यासाठी भावनिक क्षण आहे, त्यांच्यासारख्या सहकाऱ्याचं निधन होणं ही केवळ राजकीय हानी नाही तर व्यक्तिशः प्रचंड वेदनादायक बाब आहे, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत हा प्रस्ताव मांडताना व्यक्त केली.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

महाविकास आघाडीच्या स्थापनेवेळी अजित पवार यांच्या पक्षासोबत युती करू असं आपल्याला कधीही वाटलं नव्हतं, मात्र जेव्हा एकत्र आलो तेव्हा त्यांच्या कामाची पद्धत कळत गेली असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात अजित पवारांची आपल्याला भक्कम साथ मिळाली असं ठाकरे म्हणाले.

**होल्ड बाईट उद्धव**

**<><><><><>**

गृहिणीच्या श्रमांमुळेच कमावत्या जोडीदाराला आपलं काम प्रभावी पद्धतीने करता येतं, त्यामुळे पोटगीचा निर्णय घेताना तिच्या या योगदानाकडे दुर्लक्ष करणं अन्याय्य असल्याचा निर्वाळा दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. नवऱ्यापासून विभक्त झालेल्या पत्नीला पोटगी देण्यासंदर्भातल्या एका प्रकरणावर न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांच्या एकलपीठासमोर सुनावणी झाली. कमावता नसलेला जोडीदार हा निष्क्रिय असतो असा दृष्टिकोन घरकामासंदर्भातल्या त्याच्या योगदानाबद्दल गैरसमज निर्माण करणारा आहे. लग्नानंतर प्रत्यक्ष संसारात घर

आणि घरगुती आघाड्यांवर काम करणाऱ्या पत्नीच्या योगदानाचं आर्थिक मूल्य ओळखता यायला हवं, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

**<><><><>**

पसमंदा मुस्लीमांना ओबीसी प्रवर्गातून नोकरी आणि शैक्षणिक प्रवेशात राखीव जागा द्याव्यात अशी मागणी करणाऱ्या याचिकेची सुनावणी सर्वोच्च न्यायालय करणार आहे. मात्र त्यासाठी मुस्लिमांमधल्या मागास जातीं◌ंची माहिती विचारली आहे.

रंगनाथ मिश्र आयोगाच्या अहवालाच्या पार्श्वभूमीवर ओबीसींचं उपवर्गीकरण करुन पसमंदा मुस्लिमांसाठी १० टक्के कोटा ठेवावा, अशी याचिका महंमद वसीम सैफी यांच्या वतीनं ज्येष्ठ वकील अंजना प्रकाश यांनी दाखल केली आहे. त्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची याच्या पीठानं आज त्यावर त्यांच्याकडे ही विचारणा केली.

**<><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या ज्या सदस्यांच्या निष्क्रिय खात्यात एक हजार रुपयांपर्यंतच रक्कम शिल्लक असेल त्यांचे पैसे परत करण्याचा निर्णय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने घेतला आहे. ही रक्कम थेट या ग्राहकांच्या आधार कार्डाला जोडलेल्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाईल. ही प्रक्रिया सुरू करण्यासाठी खातेदारांनी कोणताही दावा किंवा कागदपत्रं सादर करण्याची गरज नाही, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

भारताचे जगाशी आंतर-संसदीय संबंध वाढवण्याच्या उद्देशाने लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी ६० पेक्षा जास्त देशांसह मैत्री गटांची स्थापना केली आहे. विविध देशांच्या विधीमंडळांशी संवाद आणि देवाणघेवाण वाढवण्यासाठी हे गट स्थापन करण्यात आले आहेत. खासदार रविशंकर प्रसाद, डॉ. एम. तंबीदुराई, पी. चिदंबरम,

राम गोपाल यादव, टी.आर. बालू, काकोली घोष दस्तीदार, कनिमोळी, असदुद्दीन ओवैसी, सस्मित पात्रा, श्रीकांत शिंदे, पी.व्ही. मिथुन रेड्डी, राजीव प्रताप रुडी आणि प्रफुल्ल पटेल यांच्यासह इतर या गटांचं नेतृत्व करतील. श्रीलंका, जर्मनी, न्यूझीलंड, स्वित्झर्लंड, अमेरिका, रशिया, दक्षिण कोरिया, ब्रिटन, फ्रान्स, जपान, इटली, ऑस्ट्रेलिया, ग्रीस, इराण, संयुक्त अरब अमिराती, यूरोपीयन महासंघ यासह विविध देशांच्या संसदेचा यात समावेश आहे.

<><><><><>

‘बुंग’ या मणीपुरी चित्रपटाने सर्वोत्कृष्ट बाल आणि कौटुंबिक फिल्म या गटात बाफ्टा पुरस्कार पटकावला आहे.  बाफ्टा अर्थात ब्रिटीश अकादमी फिल्म आणि टेलिविजन आर्ट्स पुरस्कार काल लंडन इथं जाहीर झाले.  मणीपुरी भाषेतल्या बुंग या शब्दाचा अर्थ छोटा मुलगा.  सामाजिक आणि राजकिय अस्वस्थतेच्या वातावरणात वाढणाऱ्या एका बालकाची कहाणी हा चित्रपट सांगतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी चित्रपटाच्या चमूचे अभिनंदन केलं आहे. हा पुरस्कार म्हणजे देशातल्या सर्जनात्मक बुद्धीमत्तेवर जगाने उमटवलेली मोहोर आहे असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना उद्या सकाळी हुबळी इथं कर्नाटक आणि जम्मू-काश्मीर यांच्यात होणार आहे. साडेनऊ वाजता सामना सुरु होईल. जम्मू-काश्मीरचा संघ यावेळी पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहोचला आहे. आठ वेळा रणजी करंडक जिंकणाऱ्या कर्नाटकाशी त्यांची लढत होणार असल्यानं या सामन्याबद्दल उत्सुकता वाढली आहे.

<><><><><>

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सुपर एटमधे आज मुंबईत वानखेडे स्टेडीयमवर झिंबाब्वे आणि वेस्ट इंडीज यांचा सामना सुरु आहे. झिंबाब्वेनं

नाणेफेक प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.शेवटची बातमी हाती आली तेव्हा वेस्ट इंडीजच्या १३ षटकात २ बाद १५० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात काल रात्री विद्यार्थ्यांच्या दोन गटात झालेल्या संघर्षाची गंभीर दखल विद्यापीठाने घेतली आहे. विद्यापीठात शांतता आणि शिस्त सुनिश्चित करण्यासाठी या गटांवर कठोर कारवाई केली जात आहे.

**//<><><><><>//**